म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा° वा°
दा. क्र. १२९८

# गधोजी शहाणे

BVBK-0401297

१२८७
२९।८।८९

# गधोजी शहाणे

: लेखक :

केशव फडणीस

पंढरी प्रकाशन

BVBK-0401297
BVBK-0401297

प्रकाशन :

प्रकाशिका :
सौ. सुप्रिया श्रीकांत डंके
पंढरी प्रकाशन
नवी पेठ, पंढरपूर.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
C/o अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११०३०.

किंमत तीन रुपये

प्रसिद्धि : मार्च १९८१

मुद्रक :
रा. शं. जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस
१०५० सदाशिव पुणे ३०.

प्राप्तीस्थान :
अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ३०.

‘ चातुर्य ’ हा एक महान गुण आहे. चातुर्याचा प्रत्यक्ष ... निरनिराळ्या पद्धतींनी माणूस करून घेत असतो. या निरनिराळ्... पद्धती म्हणजे माणसाच्या जीवनातल्या भिन्न भिन्न अनुभवांच्या गोष्... कधी प्रसंगावधान, कधी गर्वहरण, कधी सूचक उपदेश, केव्हा हवं त... प्राप्त करून घेण्यासाठी कृती, अशा विविध पद्धतींनी माणसाचं चातुर्य प्रकट होत असतं.

या पुस्तकात अशाच काही गोष्टी दिल्या आहेत. त्यातून माणसांच्या जीवनात येणाऱ्या वेगवेगळ्या प्रसंगांच्या गोष्टी तर आहेतच, पण त्याचबरोबर त्या त्या वेळी चतुरपणाच्या कसा नी किती उपयोग होतो, तेही स्पष्ट झालं आहे.

—लेखक

ग्र. क्र. १२८२७ दि. २१/८/९
विषय

# १ गधोजी शहाणे

शूरपूरचा राजा घबराटसेन. त्याला थट्टा-मस्करी, गप्पागोष्टी करण्याचा खूप नाद. तो स्वतः मित्रा होता. दुसरा कुणी काय सांगायचा ते ऐकत रहायचा. त्याला अशी एखादी गोष्ट पसंत पडली की, तो खूष व्हायचा आणि त्या माणसाला खूप मोठं इनाम द्यायचा.

राजाची ही आवड पाहून अनेक लोक नाना तऱ्हेच्या गप्पागोष्टी सांगून इनाम मिळवीत.

गधोजी शहाणे हा असाच गप्पिष्ट ! लोक त्याला मूर्ख म्हणायचे–अगदी शिरोमणी-पण लोकांना तो असा गुंगवायचा की ज्याचं नाव ते ! तो शूरपूर नगरात आला तेव्हा दरबारी मंडळींनीं राजाला सांगितलं, ‘ महाराज, गधोजी शहाणे नावाचा मूर्ख माणूस आपल्या नगरात आला आहे. तो मूर्ख आहे पण गोष्टी चांगल्या सांगतो. त्याच्या मूर्खपणाचीसुद्धा एक तऱ्हा आहे. ’

राजानं लगेच आज्ञा केली अन् त्याला बोलावून घेतलं. आल्यानंतर त्यानं राजाला लवून मुजरा केला. अन् म्हणाला, ' महाराज, या देहाला गधोजी शहाणे म्हणतात. '

' गधोजी अन् शहाणे ? अरे, गधा कधी शहाणा असू शकतो का ? ' महाराजांनी विचारले.

' महाराज माफी असावी. पण शूरपूरचा राजा घबराटसेन असू शकतो तर –'

' खामोश ! कोणापुढे बोलतो आहेस ? हे बोलता-नाही राजा घाबरून गेला. आता त्याला शिक्षा काय करावी म्हणून त्यांनी प्रधानजींना बोलावून घेतलं. ' प्रधानजी, यानं माझा अपमान केला, काय शिक्षा देऊ ? ' ' महाराज याला गोष्ट सांगायला सांगा. ' हं, त्याला हीच शिक्षा देऊ–गधोजी, आमच्या कानांवर आलं आहे तू गोष्टी चांगल्या सांगतोस आणि त्यासुद्धा खोट्या गोष्टी खऱ्या म्हणून सांगतोस. ' यावर गधोजीनं मान हलवून हो म्हटलं. घबराटसेन म्हणाला, ' मला एक खोटी गोष्ट सांग. पसंत पडली तर काय मागशील ते इनाम देईन. पण गोष्ट खरी ठरली तर मात्र अगदी कडक शिक्षा देईन. समजलं !

‘मग तो दुसरा कोणीतरी असला पाहिजे. मी आजपर्यंत लाल साफा कधीच बांधला नाही. नेहमी हिरव्या काठांचा साफा बांधत आलो आहे.’

सुपारीलालच्या या चतुर बोलण्यावर राजाची काही डाळ शिजली नाही. खरं म्हणजे राजानं मुद्दामहूनच उदास आणि दु:खी कष्टी होण्याचं नाटक केल होतं. सुपारीलालला मूर्ख बनविण्याचा त्याचा इरादा होता.

राजवाड्यात सुपारीलालची कीर्ती हळूहळू सगळीकडे पसरू लागली. त्याचबरोबरच वेड्यावाकड्या अफवाही पसरू लागल्या. तो म्हणे चुटकी वाजवून बाईचा पुरुष आणि पुरुषाची बाई करतो. वाघाला नुसता चल म्हणून पिंजऱ्यात ढकलतो-भुतांशी गोष्टी करतो. इत्यादी. ठाणेगडची राजकुमारी कुरूप होती. तिनं ऐकलं की, सुपारीलाल कुरूप माणसाला स्वरूप करतो, तेव्हा ती गहलकोटला येऊन धडकली सुपारीलालला भेटून म्हणाली,

माझ्या चेहऱ्यावर डाग आहेत, देवीच्या खुणा आहेत. काय तू मला सुंदर, रूपवान करशील का?’

‘हो करू शकेन की,’

'तुझ्यापाशी असा काही लेप आहे का की जो लावून....'

'नाही, मी फक्त सल्ला देतो आणि त्या अगोदर दहा हजार रुपये मोबदला म्हणून घेतो.'

'ठीक आहे. मी तुमचा सल्ला मानीन. हे घे दहा हजार रुपये, आता सांगा बरं सुंदर होण्यासाठी काय करायला पाहिजे?' राजकुमारीनं उतावीळ होऊन विचारलं.

माझा सल्ला असा; की जेव्हा केव्हा कुणी तुझ्याकडे पाहील तेव्हा तू घुंगट घे. लोकांना तू सुंदर भासशील!'

हे ऐकून राजकुमारीची शुद्धच हरपली. जोधपूरच्या नव्या महाराजांचा राज्याभिषेक होणार होता. राजा तख्तसिंहासनीही आपला प्रधान आणि सुपारीलालला बरोबर घेऊन जाण्याचं ठरवलं. नव्या महाराजांना भेटीदाखल देण्यासाठी त्यानं चांदीच्या नाण्याची एक थैली भरून कमरेला बांधली आणि जोधपूरचा हा प्रवास उंटावरून केला.

जेव्हा समारंभ सुरू झाला आणि भेटी देण्याचा प्रसंग आला तेव्हा एकाएकी तख्तसिंह राजाचा चेहरा

काट्यांमुळे उंटाच्या पाठीला जखम झाली. दोघा भावांनी वैद्याला बोलाविलं. वैद्यराज म्हणाले, बदामाचं लाकूड जाळून ते तेलांत मिसळा आणि ते मिश्रण त्याच्या जखमेवर लावा. जखम लगेच भरून येईल.' यामुळे उंटाची पाठ बरी झाली पण आणखीन एक नवीनच चमत्कार झाला. त्याच्या पाठीवर एक बदामाचं झाड उगवलं. लवकरच त्या झाडाला फळं येऊ लागली. त्यावर बदामाचे घोसच्या घोस लटकू लागले. उंट जेथे जेथे जात असे तेथे तेथे ते बदामाचं झाडही हलत डुलत त्याच्या साथीनं चालू लागे.

रस्त्यात त्या झाडावरून बदाम खाली पडत अन् वाटसरू ते उचलून खाऊन टाकीत. अटक आणि मटकने एक युक्ती काढली. त्यांनी एक भला मोठा खड्डा खणला अन् त्या खड्ड्यात उंटाला उतरविलं आणि लगेच त्या खड्ड्यात कडेकडेने माती भरली. आता उंट काही हालचाल करू शकत नव्हता.

'आता तो उंट जिवंत आहे की मेला आहे?' राजानं मधेच गधोजीला टोचून विचारलं.

'महाराज, मला त्यासाठी खड्डा खणून बघायला पाहिजे. अन् मग माझी ही गोष्ट अर्धवटच राहील. आपण पहिल्यांदा माझी गोष्ट तर ऐका; नंतर उंटाला

जिवंत किंवा मेलेला जसा असेल तसा हजर करीन.' गधोजीनं हसत हसत सांगितलं.

' आतां बदामाचं झाड खूप मोठं झालं. एका माणसाला झाडावर चढून बदाम तोडून खाली आणण्यासाठी एक-एक दिवस लागू लागला.

एके दिवशी अटक त्या झाडाखाली उभा होता. तेव्हा त्यानं झाडाच्या फांदीवर एक चिमणी बसलेली पाहिली. त्यानं मातीचं एक ढेकूळ घेऊन चिमणीकडे फेकलं. चिमणी उडून गेली. पण ते मातीचं ढेकूळ मात्र फांदीत अडकून राहिलं. त्याच वेळेला पाऊस सुरू झाला. पाण्यात भिजून ते ढेकूळ पसरू लागलं अन् लवकरच झाड मातीनं भरून निघालं. पाऊस थांबला तसा अटक शिडीवर चढून झाडावर गेला अन् त्यानं पाहिलं तो काय झाडाच्या शेंड्यावर भलं मोठं लांब-रुंद मैदान तयार झाले होते.

अटक घाईघाईनं उतरून खाली आला आणि सगळ्या जनावरांना घेऊन वर गेला. गायी, म्हशी, बैल, घोडे सबंध दिवसभर तिथं हिरवं गार गवत खात आणि चरत बसले होते.

यानंतर अटक आणि मटकचे वडील त्यांना म्हणाले, ' बाबांनो, देवानंच जणु आपल्याला हा

जमिनीचा हिरवागार तुकडा मिळवून दिला आहे. 'आपण आता येथेच शेती करू. चला, बैल नांगर घेऊन वर चला.'

बैल, नांगर आणि शेतीची इतर अवजारे घेऊन सगळेजण झाडावर चढून गेले. एक खार अशीच सरसूचे दाणे घेऊन झाडावर चढून जात होती. आणि अचानक अटकचा पाय त्या खारीवर पडला. खारीबरोबर ते सरसूचे दाणेही खाली पडले. आणि काय आश्चर्य तेलाच्या धारा वाहू लागल्या. पहिल्याप्रथम झाडावरची सगळी जमीन तेलानं भिजून चिकट झाली, मग तेल वहात वहात खाली येऊ लागलं.

गावातल्या गल्लीबोळात तेलाच्या नद्या वाहू लागल्या. रस्ते इतके गुळगुळीत झाले की, लोक घसरून पडू लागले. अटक, मटक आणि त्याच्या घरांतील इतर लोक झाडावरच्या जमिनीवर शेत नांगरणी करीत होते. इतक्यात तुफान वादळ झालं. लोक घाबरून गेले. तिथं आसरा घेण्यासाठी जागाही नव्हती.

त्यावेळी अटकला आपल्या वडिलांच्या कानां-मध्ये थोडी जागा दृष्टीस पडली. तो त्यांच्या कानांत

जाऊन बसला. मटकही त्याच्या पाठोपाठ आत जाऊन बसला. एक–दोन नाही चांगले शंभर दिवस वादळ चालू होतं.

शेवटी एकदाचं वादळ थांबलं. सूर्याचं दर्शन झालं. अटकनं बाहेर पाहिलं तेव्हा तो चकित झाला. इतके दिवस जोराचा पाऊस पडल्यानं जमिनीचा तो तुकडा वाहून गेला. बदामाच्या झाडाचाही पत्ता नव्हता. ते सगळेजण अधांतरीच लटकले होते.

हे पाहून अटक-मटक जोरजोरात रडू लागले. 'आता कसं होणार ? आम्ही खाली कसे उतरणार ?'

तेव्हा त्यांचे वडील म्हणाले, 'अरे यात, घाबरण्यासारखे काय आहे ? असं म्हणून त्यांनी हवेचा एक दोर वळायला सुरुवात केली. लवकरच त्यांनी एक मजबूत दोर तयार केला आणि मग सगळे त्या दोरावरून खाली उतरले.'

एवढी गोष्ट सांगून गधोजी गप्प बसून राहिला. तेव्हा राजा खबराटसेननं विचारलं,

'गधोजी, गोष्ट तर चांगली आहे पण मला एक सांग, ही खरी आहे का खोटी आहे ?'

'महाराज, गोष्ट खरी आहे.'

'अरे, मी तर तुला खोटी गोष्ट सांगायला सांगितली होती!' राजा घबराटसेन उसनं अवसान आणून गरजला,

'चल, शिक्षेसाठी तयार हो–'

'पण महाराज, ही गावगप्पा मी खरी म्हणून सांगितली याहून आणखी खोटी गोष्ट काय असणार?'–गधोजीनं हसत हसत सांगितलं.

सारा दरबार खूष होऊन हसू लागला. राजानं गधोजीची पाठ थोपटली अन् त्याला खूप मोठं बक्षीस दिलं.

गधोजी शहाणे चतुरसेन शहाणे झाले.

* * *

म. ग्रं. ... ग्रंथालय शाखा.
दा. क्र. ९२८७ दिनांक २९।८।९७
विषय
क्र. ...

## २ तीन विचित्र अटी

हरीपूरला एक व्यापारी राहात होता. बनवारी त्याचं नाव! त्याचा खूप मोठा वाडा होता. पैसा-अडका, नोकर-चाकर यांची रेलचेल होती. पण हाय! एवढं असूनही बनवारी सुखी नव्हता. त्याचा एकुलता एक मुलगा विमल हा अगदी मंदबुद्धीचा होता. त्याच्या अंगात हुशारी म्हणून नावालाही नव्हती. त्याचं गणित कच्चं होतं. त्यामुळे हिशेब त्याला अजिबात जमत नव्हते. साधी खरेदी-विक्रीही त्याला जमत नसे. बनवारीला त्याची काळजी वाटू लागली. 'आपल्यानंतर याचं कसं होणार? लोक याला फसवणार. मी जे काही मिळवलं आहे ते सगळं हा मुलगा घालवून बसणार.'

एक दिवशी बनवारी खूप वेळ याच गोष्टीचा विचार करीत बसला. एके दिवशी त्यानं मुलाला बोलावलं आणि सांगितलं, 'विमल, मी आता थोड्या दिवसांचा सोबती आहे— मी थकत चाललो आहे.

माझ्यानंतर तुला कोणी चार उपदेशाच्या गोष्टी सांगेल असा आपला जवळचा माणूस नाही. तेव्हा मी काय सांगतो ते लक्षात ठेव. वाटल्यास माझा उपदेश मी लिहून ठेवतो.'

'तसंच करा बाबा,' बिमल म्हणाला, 'म्हणजे माझ्या कायमचा आठवणीत तो राहील.'

'घरापासून दुकानापर्यंत कधीही सूर्यप्रकाशात चालू नकोस.'

बिमलनं लिहिलं, 'तांदूळ म्हणजे भात हेच तुझं रोजचं अन्न असलं पाहिजे.' आणि तिसरं म्हणजे 'प्रत्येक आठवड्याला लग्न करून नवीन बायको कर.'

बिमलनं त्या सूचना वाचल्या, पण त्याला काही समजलं नाही. 'बाबा तुम्ही म्हणता ते सगळं मी करीन, पण मला याचा काहीच उलगडा होत नाही आणि या गोष्टीचा मला काय उपयोग होणार हेही कळत नाही.

असू दे! आता न कळू दे. वेळ आली म्हणजे समजेल.' काही वर्षांनंतर बनवारी मरण पावला. बिमलनं आपल्या वडिलांनी केलेला उपदेश लक्षांत ठेवला होता. त्याला वाटलं, वडिलांनी केलेल्या तीनही

# २ तीन विचित्र अटी

हरीपूरला एक व्यापारी राहात होता. बनवारी त्याचं नाव! त्याचा खूप मोठा वाडा होता. पैसा-अडका, नोकर-चाकर यांची रेलचेल होती. पण हाय! एवढं असूनही बनवारी सुखी नव्हता. त्याचा एकुलता एक मुलगा विमल हा अगदी मंदबुद्धीचा होता. त्याच्या अंगात हुशारी म्हणून नावालाही नव्हती. त्याचं गणित कच्चं होतं. त्यामुळे हिशेब त्याला अजिबात जमत नव्हते. साधी खरेदी-विक्रीही त्याला जमत नसे. बनवारीला त्याची काळजी वाटू लागली. 'आपल्यानंतर याचं कसं होणार? लोक याला फसवणार. मी जे काही मिळवलं आहे ते सगळं हा मुलगा घालवून बसणार.'

एक दिवशी बनवारी खूप वेळ याच गोष्टीचा विचार करीत बसला. एके दिवशी त्यानं मुलाला बोलावलं आणि सांगितलं, 'विमल, मी आता थोड्या दिवसांचा सोबती आहे- मी थकत चाललो आहे.

माझ्यानंतर तुला कोणी चार उपदेशाच्या गोष्टी सांगेल असा आपला जवळचा माणूस नाही. तेव्हा मी काय सांगतो ते लक्षात ठेव. वाटल्यास माझा उपदेश मी लिहून ठेवतो.'

'तसंच करा बाबा,' बिमल म्हणाला, 'म्हणजे माझ्या कायमचा आठवणीत तो राहील.'

'घरापासून दुकानापर्यंत कधीही सूर्यप्रकाशात चालू नकोस.'

बिमलनं लिहिलं, 'तांदूळ म्हणजे भात हेच तुझं रोजचं अन्न असलं पाहिजे.' आणि तिसरं म्हणजे 'प्रत्येक आठवड्याला लग्न करून नवीन बायको कर.'

बिमलनं त्या सूचना वाचल्या, पण त्याला काही समजलं नाही. 'बाबा तुम्ही म्हणता ते सगळं मी करीन, पण मला याचा काहीच उलगडा होत नाही आणि या गोष्टीचा मला काय उपयोग होणार हेही कळत नाही.

असू दे! आता न कळू दे. वेळ आली म्हणजे समजेल.' काही वर्षांनंतर बनवारी मरण पावला. बिमलनं आपल्या वडिलांनी केलेला उपदेश लक्षांत ठेवला होता. त्याला वाटलं, वडिलांनी केलेल्या तीनही

सूचना एकदमच अमलात आणाव्यात. त्या सूचनांचं पालन केलं पाहिजे, त्यांना समाधान वाटेल.

त्यांनी लिहिलं होतं–'सूर्यप्रकाशात चालू नको.' विमल यावर काय करणार होता. आता घरापासून दुकानापर्यंत तो काय छप्पर घालणार होता ? लोकांनी वेड्यात काढलं असतं. असं छप्पर घालणं म्हणजे मूर्खपणा होता, आणि ते खर्चाचं होतं. लोकांना विमलनं हा वडिलांचा उपदेश सांगितला तेव्हा ते त्याची टर उडवू लागले.

'हा सगळा पैसा असाच उडवणार आणि मग दुकान नाही अन् काही नाही.'

लोकांची ही बोलणी ऐकून विमल अगदी त्रासून गेला.

दुसरी सूचना – 'भात हे रोजचं जेवण असावं. हे काही फारसं अवघड नव्हतं. तरीपण सुरुवातीला विमलला ते ठीक वाटले–नंतर मात्र त्याला त्याचा कंटाळा यायला लागला.

आणि तिसरी सूचना–तो बहुमोल उपदेश पार पाडणे.

म्हणजे विमलची परीक्षाच होती. कोण मुलगी आठ दिवसांसाठी त्याच्याशी लग्न करील ?

बिमलच्या वडिलांचे हे तीन उपदेश आणि त्याचं पालन करण्याची बिमलची आटापीट हा हरीपूरच्या लोकांचा चेष्टेचा विषय झाला होता.

एके दिवशी बसंती नावाच्या तरुण मुलीनं बिमलची ही हकीकत आणि त्याच्या वडिलांचे ते तीन उपदेश ऐकले. त्या वृद्ध व्यापाऱ्याच्या मनात काय होते आणि त्या तीन उपदेशांचा अर्थ काय हे तिनं लगेच ओळखलं. बिमलची स्थिती पाहून तिला वाईट वाटलं. लोकांनी त्याची अशी चेष्टा करावी हे तिला आवडलं नव्हतं. आपल्या मगदुराप्रमाणे तो वडिलांच्या आज्ञेचं पालन करतो आहे, याचंच तिला कौतुक वाटलं आणि एक दिवशी बसंतीनं आपण बिमलशी लग्न करणार म्हणून आपल्या आई-वडिलांना सांगितलं. हे ऐकून ते घाबरूनच गेले. आणि म्हणाले, ‘ अग आठ दिवसांनी तो तुला घराबाहेर हाकलून देईल तेव्हा तू त्याचं काय करणार आहेस ? ’

‘ तो तसं करणार नाही ’ बसंती खात्री देऊन म्हणाली, ‘ तुम्ही बघाच. ’

बिमलनं बसंतीला जेव्हा पाहिलं तेव्हा लगेच त्यानं तिच्याशी लग्न करण्याचे ठरविले. कारण ती दिसायला सुरेख होती. मनामिळाऊ होती. आपली

वडिलांची हकीकत तिला ठाऊक आहे हे त्याला माहीत नव्हतं. त्यानं जेव्हा आपल्या वडिलांनी दिलेल्या उपदेशाची माहिती तिला दिली तेव्हा ती म्हणाली–'मला सारं ठाऊक आहे. तुम्ही काळजी करू नका. माझं काय होईल ते मी बघून घेईन.'

मोठ्या धामधुमीत आणि डामडौलाने लग्न साजरं झालं. रोषणाई, वाद्य–संगीत, पक्वानांचे जेवण सर्व काही यथासांग पार पडले. खूप पाहुणे आले होते. त्यांनी जेवण-खाण्याचा समाचार घेतला पण 'हा सगळा मूर्खपणा आहे–नव्या सूनबाईला एका आठवड्यात घर सोडून जावं लागेल' असं म्हणायला काही कमी केलं नाही.

तो आठवडा कसा निघून गेला समजलं नाही. सातव्या दिवशी बिमल जागा झाला तो काळजीतच ! त्याला बसंतीला आता परत पाठवायला पाहिजे होते. ती वेळ आली होती. काहीतरी खुसपट काढली पाहिजे, नाहीतर ती जाणारच नाही.

पण बसंतीनं काय करायचं ते मनाशी ठरवलं होतं. सातव्या दिवशी संध्याकाळी बिमल जेव्हा जेवावयास आला तेव्हा बिमल पानावर बसला असता

हो, हो म्हणून गधोजीनं गळा साफ केला अन् सांगायला सुरुवात केली.



'एक होता अटक, एक होता मटक ! दोघेही भाऊभाऊ होते. अटक होता मटकचा धाकटा भाऊ. अटक होता वीस वर्षांचा ! तर मटक होता दहा वर्षांचा. एक दिवस काय झालं. मटक जोरजोरात रडत होता. आईनं अटकला बोलावून सांगितलं, ' अटक बेटा, जरा तुझ्या मोठ्या भावाला बाजारातून हिंडवून आण. '

बस ! अटकनं मोठ्या भावाला कडेवर घेतलं अन् तो बाजारात निघाला.

रस्त्यात मटक म्हणाला, ' मी एक कोंब . विकत घेणार आहे. ' अटकनं त्याच्यासाठी एक कोंबडी विकत घेतली अन् मटकचं रडणं थांबलं.

ते थोडे दूर जातात तोच त्या कोंबडीचं रूप बदलायला लागलं. पाहता पाहता त्या कोंबडीचा उंट झाला. उंटावर बसून ते घरी आले. वाटेत त्यांना लोकांनी विचारलं, ' काय, उंट केव्हा खरेदी केला? ' तेव्हा दोघांनी उत्तर दिलं. ' कोंबडीचा झाला उंट ! '

घरी आल्यावर त्यांनी उंटाला दरवाजाच्या बाहेर बांधून ठेवलं. त्याच्यापुढे चारा टाकून ते घरात गेले. तो उंट खूप खादाड होता. घरांत जेवढा म्हणून चारा होता तो सगळा त्यानं खाऊन टाकला. ते पाहून त्यांनी उंटाला शेतावर नेलं. चांगलं हिरवंगार शेत पिकलं होतं. उंटानं पाहता पाहता सगळं शेत खाऊन टाकलं.

' बराच खादाड होता वाटतं उंट ! ' राजा घवराटसेन आपल्या मिशीवर ताव देऊन हसू लागला.

गधोजीनं राज्याच्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही अन् तो आपली गोष्ट पुढं सांगू लागला.

' नंतर अटक–मटकनं खूप मोठ्या लाकडांची मोळी केली अन् ती उंटावर लादली. लाकडांच्या

म्हणाला, ‘ चल काय भात शिजवला आहेस तो घेऊन ये. ’

बसंती एका थाळीत गरम गरम पुऱ्या आणि बटाट्याची भाजी घेऊन आली.

‘ हे काय हे ? घेऊन जा ते ! माझ्या डोळ्यांसमोर असले पदार्थ नकोत. मला त्याची भीती वाटते. माझा नेहमीचा भात घेऊन ये. ’

थोड्या वेळातच बसंतीने भात आणि थोडं कालवण आणलं.

‘ हा काय भात आहे ? ’ बिमल रागावून ओरडला, ‘ त्यापेक्षा चिखल खाल्लेला काय वाईट ? ’

बसंतीनं ती थाळी परत नेली आणि चिखलानं भरलेली दुसरी थाळी आणली. बिमलनं ओळखलं हिनं आपली जिरवली आहे. ‘ जा निघून जा, ’ तो दुःखी स्वरात म्हणाला, ‘ मी तुला इतःपर येथे राहू देणार नाही. वडिलांनी केलेल्या उपदेशाप्रमाणेच मी वागणार. ’

‘ मूर्ख आहात झालं. ’ बसंती त्याच्याजवळ येत म्हणाली, ‘ तुमचे वडील खरोखर हुषार आणि

कनवाळू होते. तुम्हाला असं वाटतं का तुमचे वडील खरंच तुम्हाला अशा हास्यास्पद गोष्टी करायला सांगतील? लोकांनी तुमची चेष्टा करावी असं ते कदापिही मनात आणणार नाहीत.'

'मग मला त्यांनी या तीन गोष्टी सांगितल्या याचा अर्थ तरी काय?

'त्यांनी जेव्हां तुम्हाला घरापासून दुकानापर्यंत सूर्यप्रकाशात जाऊ नको असं सांगितलं याचा अर्थ तुम्ही दुकानात लौकर जावं; उशीरा परत यावं. म्हणजे दिवसभर उद्योगधंद्यात तुमचं लक्ष लागेल. त्यांनी जेव्हा तुम्हाला फक्त भातच खायला सांगितला याचा अर्थ तुम्ही जेवढं आवश्यक तेवढंच खावं, कुठल्याही गोष्टीचा अतिरेक करू नये.'

'आणि तिसरा उपदेश?' बिमलनं ओरडूनच विचारलं,

'म्हणे प्रत्येक आठवड्याला नवीन बायको कर.'

'नाही—त्याचा अर्थ असा नाही. तुमच्या वडिलांना सांगायचं होतं ते हे की आपल्या बायकोवर नेहमी प्रेम करावं-तिला प्रेमानं वागवावं. नवीन लग्न झाल्यानंतर जितक्या प्रेमानं आपल्या बायकोला

सांभाळतो तसंच सदैव कायम ठेवावं. प्रत्येक आठ-वड्याला जणू आपलं नवीनच लग्न झालं आहे असं वाटलं पाहिजे.'

बिमलला आपल्या बायकोचे बुद्धिचातुर्य पाहून खूप आनंद झाला आणि ते दोघे सुखात राहू लागले.

* * *

# 3 सुपारीलाल

अकबराच्या राज्यात ज्याप्रमाणे बिरबल हजर-जबाबीपणा, चातुर्यासाठी प्रसिद्ध होता तसाच गहला-कोटचा राव तख्तसिंह याच्याकडे सुपारीलाल सरदार बोलण्यात आणि वागण्यात खूप हुशार आणि चतुर होता.

राव तख्तसिंहाच्या दरबारी येण्याच्या अगोदर सुपारीलाल मेंढ्या-बकऱ्या पाळत होता. त्यांना गवत घालण्यासाठी रानात नेत होता. एक बोलभांड म्हणून सुपारीलाल लोकांना माहीत होता. त्याचा जबाब सडेतोड आणि रोकठोक असायचा असं सांगतात. एकदा राजा तख्तसिंह जंगलात शिकार करण्यासाठी गेला असताना त्यानं सुपारीलालला पाहिलं. तो एका झाडाच्या बुंध्याला टेकून बसला होता. आणि हवेतच हातवारे करीत काहीतरी बडबड करीत होता. राजाला या गोष्टीचं मोठं नवल वाटलं. आणि तो एका झाडामागे लपून बसला आणि तो

काय बोलतो आहे ते ऐकू लागला. थोड्याच वेळात राजा त्याचं बोलणं ऐकून अगदी खूष होऊन गेला. सुपारीलाल अगदी नाटकी ढंगाने स्वतःशीच वाद-विवाद करत होता. तो या संभाषणात अगदी गुंग होऊन गेला होता. तो स्वतःच स्वतःला काही प्रश्न विचारी आणि थोडा वेळ विचार करून आपणच त्याचं उत्तर देई. राजाला त्याची ही गंमतीदार कृती पाहून हसू आवरेना. तो त्याच्या समोर आला आणि म्हणाला, 'अरे भाई, हे काय चाललं आहे ? तू कुणाशी बोलतो आहेस ? काही सांगशील तर खरं !'

सुपारीलालने चमकून राजा तख्तसिंहाकडे अगदी निरखून आपादमस्तक पाहिले. आणि हात झटकून अगदी निराश स्वरात तो म्हणाला, 'हीच तर माझी अडचण आहे. मी समजूतदार माणसाशीं आपल्या चार गोष्टी सांगायला म्हणून जातो आणि उत्तरादाखल समजदारीच्या चार गोष्टी ऐकावयालाही मिळाव्या म्हणून पहातो आणि यासाठींच स्वतःशीच सवाल जबाब केल्याशिवाय माझा इलाज चालत नाही.'

एका मेंढपाळाच्या तोंडून असले विचार ऐकल्या-वर राजाची मती गुंग झाली. सुपारीलालची नीट

आरख पारख करण्यासाठी म्हणून त्यानं विचारलं, ' काय रे, तू राव तख्तसिंहाना ओळखतोस का ? '

' नाही ' सुपारीलालने मान हलविली. 'अजब माणूस आहेस ! काही दिवसांपूर्वीच मी तख्तसिंह राजांना भेटलो होतो. राजे तर तुला चांगले ओळखतात. '

' आपली खोटी शान मिरविण्यासाठी काहीतरी थापा मारत असतील. ' असं म्हणून सुपारीलाल आपल्या शेळ्या-मेंढ्या हाकायला लागला.

राजाला त्याच्या उत्तरातील स्वाभिमानाची झलक पाहून खूप आनंद झाला. यावेळेपर्यंत राजाचा प्रधान आणि इतर सरदारही घोडदौड करीत तेथे येऊन पोचले होते. राजाने त्या सर्वांना एक प्रश्न केला, ' जर मी तुम्हांला ५००० रुपये दिले तर अगदी पहिल्या प्रथम तुम्ही काय कराल ? '

' मी एक चांगल्यापैकी घोडा खरेदी करीन. ' प्रधानानं सांगितलं.

' मी त्या रुपयातून माझ्या घराची सजावट करून घेईन. ' सेनापतीनं सांगितलं.

' मी एक बगीचा बनवून घेईन ' राजवैद्यांनी सांगितलं.

राजाचं काही समाधान झालं नाही. त्यानं सुपारीलालकडं पाहिलं आणि त्याला विचारलं, 'तुला जर आता मी ५००० रुपये दिले तर सर्वप्रथम तू काय करशील ?'

सुपारीलालनं ताबडतोब उत्तर दिलं, 'मी पहिल्याप्रथम ते मोजून घेईन.'

राजा त्याच्या या उत्तरावर आणि हुषारीवर खूष झाला, इतर सरदार, दरकादारांचे चेहरे मात्र पडले.

'तुला निशाणबाजी येते का ?' राजाने सुपारीलालला विचारले.

'येते थोडीफार.'

'मग ही बंदूक घे आणि निशाणबाजीचा सराव कर. आम्ही शिकारीच्या वासावर जंगलात एक चक्कर मारून येतो. तोपर्यंत तू आपला कोळशानं एक वर्तुळ मारून घे आणि त्याच्या मधोमध नेम मारण्याचा प्रयत्न कर.'

राजा आपले सैन्य घेऊन निघून गेला. सुपारीलाल गावच्या एका जत्रेत बंदुका चालवायला शिकला होता. पण नेमबाजी हा प्रकार त्याला कधीच जमला नव्हता. बंदुकीचा नेम त्याच्यापासून हजारो

मैल दूर होता. पण संध्याकाळी जेव्हा राजा तख्तसिंह परत आला तेव्हा त्याला झाडावर कोळशानं काढलेली वर्तुळं दिसली आणि मधोमध बंदुकीच्या गोळीचा नेम बसलेल्या खुणाही दिसल्या. त्याने तमाम सरदारांच्या-समोर सुपारीलालच्या नेमबाजीची प्रशंसा केली आणि मग सुपारीलालकडे वळून तो म्हणाला, 'वा, भाई वा! तू तर कमालच केलीस. तुझ्या नेमबाजीची मला कल्पना असती तर मी तुला माझ्याबरोबर शिकारीलाच नेलं असतं आणि दिवसभर तुझ्या या कौशल्याची कमाल पाहिली असती. ते असो, पण तू इतका अचूक नेम कसा धरतोस ते तरी सांग.'

सुपारीलाल संकोचानं गुदमरून गेला आणि थोड्या वेळानं म्हणाला, 'एका जत्रेत मी बंदूक चालवायला शिकलो होतो. त्यानंतर आजच मला परत ती चालवायला संधी मिळाली.'

'अरे वा!' राजा आश्चर्याने म्हणाला, 'मग तर तू बेहद्द करामती नेमबाज आहेस. इतका साफ, सरळ नेम?'

'अगदी सोपं आहे ते महाराज,' सुपारी-लालनं सांगितलं, 'मी पहिल्यांदा सगळ्या गोळ्या उडवून संपवून टाकल्या आणि मग जेथे जेथे त्यांचा नेम लागला होता त्या त्या ठिकाणी मी वर्तुळं ओढली.

आता तर राजा आणि सगळे सरदार आश्चर्यानं सुपारीलालकडे पहात राहिले. त्याच्या चातुर्याची ते मोकळेपणाने तारीफ करू लागले. त्याची चाल-चलणूक अगदी साधी होती. त्यामुळे सुपारीलाल त्याच्या मनात भरला. अशी व्यक्ती आपल्या दरबारात पाहिजेच म्हणून सर्व सरदारांनी ठरविलं. कशीबशी समजूत काढून सुपारीलालला त्यांनी गहलकोट या राजधानीच्या शहरी जाण्यासाठी तयार केलं, त्याची एक अट होती. ती ही की, तेथेही त्याला शेळी, मेंढ्यांना चरायला नेता आलं पाहिजे. तो रोज दरबारात मात्र हजेरी देऊन जाणार होता.

अशा रीतीने सुपारीलाल कायमचा असा गहलकोटचा नागरिक झाला. राजाने त्याला एक हिरवागार जमिनीचा पट्टा जहागिरीदाखल दिला. त्या ठिकाणी तो आपला शेळ्या-मेंढ्या पाळून गुजराण करू लायला. फावल्या वेळात अलगुज वाजवीत असे आणि जीभ चुरूचुरू लागली म्हणजे लगेच दरबारात येऊन हजर व्हायचा.

आजही सुपारीलालचे हजरजबाबी आणि मजेदार किस्से घरा-घरांतून गावा-गावांतून सांगितले जातात. हट्टी माणूस असो, रागीट असो, चिडका

असो, सुपारीलालचे नाव घेतलं की त्याला हसूच यायचं आणि तो त्याच्या गप्पाटप्पात सामील व्हायचा.

एकदा एक दिवशी गहलाकोटच्या गल्लीतून हिंडत असताना सुपारीलालनं जिकडे तिकडे घाण पडलेली पाहिली. माशा घोंघावताहेत. डुकरं फिरताहेत. एकदा राजा तख्तसिंह नोकराकडून तेलमालीश करून घेत होता, थंडीचे दिवस होते. सुपारीलालही त्यांच्याजवळ बसून हातापायांना शेक घेत होता. अचानक त्यानं राजाच्या पोटाकडे पाहिलं आणि तो विचारू लागला, 'महाराज, आपल पोट तर खूप मोठं आहे. त्याच्यात एवढं भरलं आहे तरी काय ?'

'घाण भरली आहे. दुसरं काय ?' राजाने थट्टेच्या स्वरात सांगितलं.

'अन्नदाता, यात आपलीच घाण आहे की साऱ्या गहलाकोटची ?' सुपारीलालनं प्रश्न केला.

राजा काहीच उत्तर देऊ शकला नाही. सुपारीलालच्या बोलण्यातला गूढ अर्थ त्यानं ओळखला आणि तावडतोब साफसफाई करण्याचा संदेश त्यानं दिला आणि स्वतः देखरेख करून साफसफाई झाल्याची खात्री करून घेतली. एके [illegible] [illegible] [illegible]सिंह

BVBK-0401297